CMYK

## आज प्रभाकर महाराज पुण्यथिती



त्यांच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम

अस्सल सोलापुरी

# सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## रेल्वेत सापडलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

✔ **सोलापूर** : दुधनी रेल्वे स्थानकात धावत्या रेल्वेखाली सापडून जखमी झालेल्या किरण दत्ता कांबळे (वय १८, रा.केसरजवळगा ता. उमरगा) हा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी पहाटे मयत झाला. ८ जानेवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास तो दुधनी रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म नं.२ येथे पॅसेंजर खाली सापडून तो जखमी झाला होता. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून २ दिवसापूर्वी रेल्वेच्या पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. या घटनेची नोंद रेल्वे पोलिसात झाली असून हवालदार वळसंकर पुढील तपास करीत आहेत.

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १३ फेब्रुवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १३६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# शिंदे गट ॲक्शनमोडवर, भाजप बॅकफूटवर

## राज्यात नव्या राजकीय समीकरणाची नांदी

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

**महाराष्ट्राच्या राजकारणात कधी काय होईल, याचा काहीच भरोसा नाही. एकीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे महायुतीत नाराज असल्याच्या चर्चांना उधाण येताना दिसत आहे. ज्येष्ठ नेते शरद पवारांकडून सन्मान स्वीकारला तसेच पवारांनी शिंदेंची तोंडभरून प्रशंसाही केली. त्याने भाजप नेत्यांना व महाविकास आघाडीतील संजय राऊत यांचा भलताच पारा चढला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतल्यानंतर शिंदे गटाच्या भुवया उंचावल्या आहेत. ठाकरे गटाचे राजन साळवींना आपल्याकडे खेचून घेत एकनाथ शिंदे यांनी भाजपला मोठा शह दिल्याचे मानले जात आहे. त्यातच शिंदे गटाचे विश्वासू मंत्री उदय सामंत यांनी पवारांची भेट घेतल्याने राज्यात नेमके काय चालले आहे, असा प्रश्न उपस्थित होत असून नव्या राजकीय समीकरणाच्या नांदीचा संशय राजकीय जाणकारांकडून व्यक्त होत आहे.**

### साळवी सिर्फ ट्रेलर, पिक्चर अभी बाकी है

कोकणात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला मोठा धक्का बसला आहे. ऑपरेशन टायगरमधून पहिला नेता फोडण्यात शिंदे यांच्या शिवसेना यश आले आहे. साळवी यांनी अखेर पक्षाला 'जय महाराष्ट्र' केला आहे. साळवी यांचा पक्ष प्रवेश हा फक्त ट्रेलर असून अजून आणखी १० एक आमदार आणि पदाधिकारी आमच्या संपर्कात आहेत. ते देखील लवकरच आमच्या बरोबर येतील, पिक्चर अभी बाकी है असे म्हणत उदय सामंत यांनी ठाकरे गटाला इशारा दिला आहे.१५ फेब्रुवारीला रत्नागिरीत शिंदे यांची मोठा सभा होणार आहे. यावेळी ठाकरे गटासह विरोधी पक्षातील काही माजी आमदार, जिल्हा परिषदेचे नेते प्रवेश करतील, असे उदय सामंत यांनी म्हटले आहे.

### अशीही चढाओढ

विधानसभा निवडणुकीच्या आधी भाजप पदाधिकाऱ्यांना संबोधित करताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी २०२९ मध्ये पक्ष स्वबळावर विधानसभा लढणार असल्याचं सांगत शत प्रतिशतची घोषणा दिलेली होती. आता राज्यात महायुती असताना शिवसेना नेते आणि आमदार सामंत यांनी शत प्रतिशतचा सूर आळवला आहे. त्यामुळे सेना, भाजपमध्ये शत प्रतिशतवरुन चांगलीच चढाओढ लागलेली दिसत आहे.



शिंदे यांना दिल्लीत शरद पवार यांच्या हस्ते महादजी शिंदे पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. यावेळी शरद पवार यांच्याकडून शिंदे यांचे कौतुक करण्यात आले. एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाला योग्य दिशा दिली, असे शरद पवार आपल्या भाषणात म्हणाले. यानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत संतापले. या घडामोडी घडल्यानंतर आणखी वेगळ्या घडामोडी दिल्लीत बघायला मिळाल्या. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे मंत्री उदय सामंत, खासदार नरेश म्हस्के यांनी दिल्लीत शरद पवारांच्या निवासस्थानी जावून त्यांची भेट घेतली. यानंतर उदय सामंत यांनी दिलेली प्रतिक्रिया ही नव्या राजकीय समीकरणांची नांदी तर नाही ना? अशी चर्चा आता रंगू लागली आहे. आम्ही पवारांशी साहित्य संमेलनाविषयी चर्चा केली आहे.आमच्या भेटीबाबत शिंदे हेच काही सांगू शकतील,असे सामंत म्हणाले.

विधानसभेच्या निवडणुकीत कोकणात भाजपला अभूतपूर्व यश मिळाले.तिथे भाजपला शह देण्यासाठी शिंदे गटाने हालचाली सुरू केल्या आहेत. तब्बल १५ वर्षे आमदार राहिलेल्या राजन साळवींनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आहे. पक्षाच्या उपनेतेपदाचा त्यांनी राजीनामा दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ते पक्षात नाराज होते. २००९ ते २०२४ अशी १५ वर्षे आमदार राहिलेल्या साळवींचा गेल्या वर्षी झालेल्या निवडणुकीत राजापूर मतदारसंघात पराभव झाला. तेव्हापासून त्यांच्या पक्षांतराची चर्चा सुरु होती. ते आज शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. साळवींचं पक्षांतर ठाकरेंसाठी धक्का मानला जात आहे. साळवी भाजपमध्ये जातील, अशी चर्चा असताना शिंदेंनी त्यांना आपल्याकडे खेचत भाजपलादेखील शह दिला आहे.

शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेनेत २०२२ मध्ये मोठे बंड झाले. त्यावेळी आमदार असलेल्या राजन साळवींनी ठाकरेंची साथ सोडली नाही. तपास यंत्रणांचा ससेमिरा मागे लागूनही ते ठाकरेंसोबत कायम राहिले. पण २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या किरण सामंत यांनी त्यांचा पराभव केला. २००९, २०१४, २०१९ असे सलग तीनवेळा निवडून आलेल्या साळवींना सामंतांनी पराभवाचा धक्का दिला. तेव्हापासूनच त्यांच्या पक्षांतराची चर्चा सुरु होती. त्यांच्या शिवसेना प्रवेशाला स्थानिक आमदार आणि मंत्री उदय सामंतांचे बंधू किरण सामंत यांचा विरोध असल्याचे बोलले गेले. पण आता किरण सामंतांनी साळवींचे पक्षात स्वागत केले आहे. आम्ही शत प्रतिशत शिवसेनेचा निर्धार केला आहे. ग्रामपंयायत असेल, नगरपालिका असेल, जिल्हा परिषद असेल, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शतप्रतिशतचा निर्धार आम्ही केलेला आहे. त्याद्दष्टीनं राजन साळवींचा पक्षप्रवेश होत आहे, असं आमदार किरण सामंत यांनी सांगितलं. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्यासाठी, शतप्रतिशत शिवसेनेसाठी आम्ही ताकद वाढवतोय, असेही सामंत म्हणाले.

## रूपाली चाकणकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट; सोलापूर जिल्ह्यातील दोन आरोपींना अटक

✔ सोलापूर/प्रतिनिधी



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी सोलापूर जिल्ह्यातील दोन आरोपींना अटक करण्यता आली आहे. या प्रकरणी आकाश दिगंबर डाळवे (वय ३०, रा. यावली, ता. मोहोळ, जि. सोलापूर) आणि अविनाश बापू पुकळे (अविनाश बापू पुकळे (वय ३०, रा. पारे कोकरेवाडी, ता. सांगोला, जि. सोलापूर) या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

राजकारण महाराष्ट्राचे या फेसबुक पेजवरून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह, अश्लील आणि अपमानास्पद पोस्ट केल्याप्रकरणी दोन आरोपींना पोलिसांनी मुंबईतून अटक केली आहे. त्यांच्यावर मुंबई सायबर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांना गिरगाव येथील १८ व्या मेट्रोपॉलिटन कोर्टात हजर करण्यात येणार आहे. या पूर्वी या प्रकरणात एकूण ९ आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून, अधिक तपास सुरू आहे.

## बांधकामावर पाणी मारताना महिलेचा मृत्यू

✔ **सोलापूर** : बांधकामावर पाणी मारत असताना विजेच्या शॉक बसल्याने २९ वर्षीय महिला जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाली. ही घटना होटगी रोडवरील बीएसएनएल कॉलनी जवळ बुधवारी सकाळच्या सुमारास घडली. जयश्री शरणबसवेश्वर कोळी (वय २९ रा. होटगी ता.दक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. ती बुधवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास होटगी रोडवरील बांधकामावर पाणी मारत होती. यावेळी विद्युत मोटारीचा शॉक बसल्याने ती बेशुद्ध झाली होती. तिला खाजगी रुग्णालयात दाखल केले असता ती उपचार दरम्यान मयत झाली. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून हवालदार परदेशी पुढील तपास करीत आहेत.

## वैरागच्या राहात्या घरी पोलिसाची आत्महत्या

✔ बार्शी/प्रतिनिधी

सोलापूर पोलीस मुख्यालयामध्ये कार्यरत असणारे पोलीस कर्मचारी महेश जोतीराम पाडुळे (वय ४५) मूळ गाव रा. आंजनगाव (ता. माढा) यांनी सध्या रा. वैराग (ता. बार्शी) या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याने पोलीस विभागात खळबळ उडाली आहे.

ही घटना बुधवारी सकाळी साडेदहा पूर्वी राहते घरी वैराग (ता. बार्शी) येथे घडली. वैद्यकिय अधिकारी यांनी दिलेल्या खबर वरून अकस्मात मयत म्हणून वैराग पोलिसात नोंद झाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी कि, सदर पोलीस कर्मचारी वर्षभरापूर्वी वैराग पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. त्यानंतर त्यांची बदली सोलापूर पोलीस मुख्यालय या ठिकाणी झाली होती. वैराग येथे त्यांचे कुटुंब वास्तव्यात होते.



सोलापूर पोलीस मुख्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या महेश पाडुळे यांनी बुधवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या पूर्वी वैराग येथील राहत्या घरी गळफास घेतला असल्याचे समजताच मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल वैराग येथे उपचाराकरिता दाखल केले होते. तेथील डॉ. सागर शिंदे यांनी ते उपचारापूर्वीच मयत झाले, असे सांगितले. त्यांच्या आत्महत्येचे कारण मात्र अद्याप समजलेले नाही. आकस्मित मयत म्हणून वैराग पोलिसात नोंद झाली आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकूल व पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी घटना स्थळास भेट दिली आहे. मयताचे शवविच्छेदन बार्शी येथे करण्यात आले आहे. त्याचे मूळ गाव आंजनगाव (ता. माढा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## दुग्ध व्यावसायिकाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर** : एका चाळीस वर्षीय विवाहित इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शेळगी परिसरातील भगवंत नगरात बुधवारी सकाळच्या सुमारास घडली.

इरप्पा सदाशिव खताळे (वय ४० रा. भगवंतनगर, मित्रनगर शेळगी) असे मयताचे नाव आहे. सकाळी १० वाजेच्या सुमारास त्याने घरातील दरवाजा आतून बंद करून लोखंडी जाळीला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला होता.

त्याला फासातून सोडवून दुपारी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. मयत इरप्पा खताडे हा दुग्धव्यवसाय करीत होता. त्याच्या पश्चात पत्नी, २ मुले आणि आई-वडील असा परिवार आहे. या घटनेची नोंद पोडभावी पेठ पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

## पुण्यात जीएसटीची रेड! १,१९६ कोटींचा घोटाळा उघडकीस

✔ **पुणे** : जीएसटी गुप्तचर महासंचालनालय (डीजीजीआय)च्या पुणे विभागीय शाखेने १,१९६ कोटी रुपयांचा मोठा जीएसटी घोटाळा उघडकिस आणला आहे.

या प्रकरणाशी संबंधित एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. पुणे, दिल्ली, नोएडा आणि मुझफ्फरनगरमधील विविध ठिकाणी छापे टाकून केलेल्या तपासात बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट (आयटीसी) व्यवहारांमध्ये सहभागी बोगस कंपन्यांचे एक अत्याधुनिक नेटवर्क आता समोर आले आहे.

अटक केलेली व्यक्ती मुझफ्फरनगरमधील एका खाजगी कंपनीची संचालक असून या ऑपरेशनमागील सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले आहे. तपासात आढळून आले आहे की, त्यांच्या ग्रुपने पत्ते, ओळखपत्रे, ईमेल आयडी आणि फोन नंबरचा डेटाबेस ठेवला होता आणि नवीन जीएसटी नोंदणी मिळविण्यासाठी आणि शोध टाळण्यासाठी शिताफीने तो वापरला जात होता. नव्याने स्थापन कंपन्यांवर याच ग्रुपमधून संचालक किंवा मालक निवडले गेले होते, ज्यामुळे फसवणूक करणाऱ्यांना बेकायदेशीर व्यवहार चालू ठेवता आले.

व्यापाराचे अस्सल चित्र उभे करण्यासाठी आरोपींनी कोणतेही कायदेशीर व्यवसाय नसलेल्या बनावट कंपन्या स्थापन केल्या होत्या. बनावट इनव्हॉइस आणि ई-वे बिल तयार केले होते. आणि या ई-वे बिलांवर चा कुठलाही उल्लेख नव्हता. त्यामुळे मालाचा प्रत्यक्ष पुरवठा झाला नसल्याचे सिध्द झाले. या बनावट टोळीने १,१९६ कोटी रुपयांचे बनावट आयटीसी मिळवले आणि दुसऱ्यांना देखील दिले.

अधिक तपासात असे समोर आले आहे की, आरोपींनी जीएसटी नोंदणीच्या कायदेशीर परिणामांची माहिती नसलेल्या आणि संशय येणार नाही अशा कर्मचाऱ्यांच्या जे प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्गातील होते. त्यांच्या वैयक्तिक माहितीचा गैरवापर केला. आयटीसी घोटाळा सुलभ करण्यासाठी या बनावट कंपन्या तपासात आतापर्यंत अशा २० बनावट कंपन्या आढळल्या आहेत. ज्यांचा कोणताही खरा व्यवसाय नाही.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांची जवळीक वाढली की यांना टेंशन येते!

| कल्याण |
| --- |
| 480-21-155 |

| मुंबई |
| --- |
| 158-46-358 |

## पद्मजादेवींची मुख्यमंत्र्यांशी बंद दाराआड चर्चा
## अकलूजच्या राजकारणात पुन्हा बदलाचे संकेत

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी मुंबई येथे भेट घेतली. या बैठकीत माळशिरस तालुक्यातील विविध विषयांसह राजकारणावर चर्चा झाली. यातून अकलूजच्या राजकारणात पुन्हा बदलाचे संकेत मिळत आहेत. ही बैठक डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांच्या भविष्यातील राजकारणाची दिशा ठरविणारी असल्याचे बोलले जात आहे. यावेळी माजी आमदार राम सातपुते उपस्थित होते.**

माजी आमदार राम सातपुते यांनी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांना भाजपामधून बडतर्फ करण्याची मागणी केल्यानंतर भाजपाकडून काय कारवाई होत आहे याकडे लक्ष आहे. असे असतानाच काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष पदाचा तडकाफडकी राजीनामा दिलेले डॉ. धवलसिंह यांच्या मातोश्री व माजी सहकार राज्यमंत्री प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या पत्नी पद्मजादेवी मोहिते पाटील यांनी आपल्या सुनबाई उर्वशीराजे यांच्यासह मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतल्याने तर्कवितर्कांना उधाण आले आहे. या भेटीमध्ये विविध विषयांवर झालेली चर्चा महत्त्वपूर्ण मानली जात आहे. माळशिरस तालुक्यात अडचणीत आलेल्या विविध सहकारी संस्था, त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजना, जिल्ह्याच्या व माळशिरस तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने अल्पावधीतच अनेक योजना कार्यान्वित होणार असल्याची माहिती यावेळी पद्मजादेवी यांनी दिली.

### फडणवीस लवकर माळशिरस दौऱ्यावर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लवकरच माळशिरस तालुक्याच्या दौऱ्यावर येणार आहेत त्यांचा तालुक्याच्या वतीने अकलूज येथे नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार असून यावेळी माळशिरस तालुक्यातील विविध विकास कामांचे उद्‌घाटनही होणार आहे.

### जुन्या आठवणींना उजाळा

या भेटीप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस आणि स्व. प्रतापसिंह मोहिते पाटील यांचे तत्कालीन सोलापूर लोकसभा निवडणुकीतील प्रसंग, २०१३ साली अकलूज येथील शेतकरी मेळाव्यातील तत्कालीन भाजपा अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांचे भाषण, जनसेवा संघटनेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या रक्तदान शिबिरासह अकलूज येथील प्रतापगडावरील आठवणी या सर्व जुन्या गोष्टींना या बैठकीत उजाळा देण्यात आला.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते पाटील, राम सातपुते, उर्वशीराजे मोहिते पाटील आदी.**

CMYK